IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): ठाणे शहर    P.S.(ठाणे): हिललाईन    Year (वर्ष): 2019

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0110    Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ): 03/04/2019 07:18 बजे

2. S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)    Sections (कलम)

| S.No. | Acts | Sections |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):

1. Day(दिवस): मंगलवार    Date From (दिनांक पासून): 02/04/2019

Time Period (कालावधी): पहर 6    Date To ( दिनांक पर्यंत): 02/04/2019

Time From (वेळेपासून): 18:20 बजे

Time To (वेळेपर्यंत): 18:20 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक ): 02/04/2019    Time (वेळ): 20:06 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ

Entry No. (नोंद 013    Date & Time (दिनांक आणि वेळ): 03/04/2019 06:59 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्तळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 2 किमी

Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): नेताजी चौक येथील साई आर्केड ,मधील सर्वानंद आप्टीशन समोरील , रोडवर त्याचे मारुती वगन आर क, एमएच 05 सीए 2141

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): तालीम बाबु शेख

(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)

(c) Date/Year of Birth (जन्म 1997    (d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):    Date of Issue (अदा केल्याची तारीख):

Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):

(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):



Scanned by CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा महात्मा फुलेनगर,समाज मंदिराजवळ, गांधी रोड,उल्हासनगर-5,हिललाईन,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा महात्मा फुलेनगर,समाज मंदिराजवळ, गांधी रोड,उल्हासनगर-5,हिललाईन,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91 8446669550

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामदास देवराव मिसाळ | | | 1. नेमणुक - मुख्यालय ठाणे शहर, प्रतिनियुक्ती गुन्हे शाखा, घटक, उल्हासनगर,उल्हासनगर,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | त्यामध्ये 2000/रू. दराच्या 15 नोटा व 500/ रू. दराच्या 100 नोटा असे एकूण 80,000/ रूपये हजर केले. | 80,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 80,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

हिललाईन पो.स्टे CR NO- II 110/2019 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. 1988 चे संशोधन 2018 कलम 7 प्रमाणे दिनांक 03/04/2019मी, तालीम बाबु शेख वय 22 वर्षे, धंदा-नोकरी, रा. महात्मा फुलेनगर, समाज मंदिराजवळ, गाधी रोड, उल्हासनगर-5, मो.नं. 8446669550, 8329954860 समक्ष हजर राहून फिर्याद लिहून देतो की,मी, वरीलप्रमाणे असुन नमुद पत्यावर माझी आई व दोन मोठे भाऊ याच्या पत्नी मुलांसह रहाणेस आहे. मागील महिन्यात होळीच्या आधी माझे मोठा भाऊ अस्लम याला उल्हासनगर गुन्हे शाखा येथे बोलावून घेवून 7-8 वर्षीपुर्वीच्या चोरीच्या जुन्या गुन्हयात अटक केली. त्यावेळी त्यांच्याकडे अटक न करण्यासाठी पैशाची मागणी ( रू. 2,00,000/-) केली. होती. परंतु एव्हढे पैसे देणे शक्य नसल्याने आम्ही पैसे दिले नाही म्हणुन त्यांनी भावाला गुन्हयात अटक केली होती. त्यावेळी दि. 18/03/2019 रोजी मलाही उल्हासनगर गुन्हे शाखा येथे बोलावले होते. तेथे साध्या कपडयातील मिसाळ नावाच्या पोलीसाने भावाला अटक केलेल्या गुन्हयात माझेही नाव असल्याचे सांगुन अटक न करण्यासाठी एक लाख रूपये लाचेची मागणी केली. त्याचवेळी तेथे माझा एक मित्र राजू देवरे याने मिसाळ साहेबांशी बोलणी करून मला पोलीस ठाण्यातच बसवुन राजू देवरे व माझा चुलत भाऊ राशेद यांनी माझ्या घरी जावून आईकडून रू.80,000/- आणले व मिसाळ साहेबांना दिले होते. त्यानतर त्यांनी मला सोडून दिले.दिनांक 30/03/2019 रोजी सध्याकाळी माझा मित्र राजू देवरे याचा मोबाईल फोन मला आल्यावर त्यावरून मिसाळ साहेब माझ्याषी बोलले व त्यांनी मला, माझ्यावर दुसरा गुन्हा दाखल होवून त्यात अटक करावे लागेल, त्यातुन बाजुला करायचे असेल तर 1,00,000/-रूपये (एक लाख रूपये) आणुन दे असे बोलले. त्यावर मी, पोलीस मिसाळ साहेब यांना सोमवारी येतो असे सांगितले होते. परंतु मला पोलीस मिसाळ याना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी, अन्टी करप्पन ब्युरो, ठाणे येथे समक्ष जावून तक्रार दिली आहे,त्यानंतर नमूद कार्यालयातील पो.निरी. आजगावकर यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दोन षासकीय पचाना पाचारण करून माझे सोबत जिल्हा विशेष लेखा परिक्षक, सहकारी संस्था, ठाणे येथील शासकीय पंचासह दिनांक 01/04/2019 रोजी सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करुन मला गाधी रोड चौक, उल्हासनगर-5 याठिकाणी पाठवून तेथे मिसाळ साहेब घेवून आलेल्या त्यांच्या मारूती वगन आर कारमध्ये मी त्यांचेशी बोलणी केल्यावरून पडताळणी करण्यात आली. करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत लोकसेवक श्री. मिसाळ, यांनी माझेशी समक्ष भेटीत केलेल्या संभाषणात प्रथम 1,35,000/-



Scanned by CamScanner

रु. ची मागणी करून त्यानंतर मला रु. 80000/- माझा मित्र राजू यांचेसह घेऊन येण्यासाठी सांगून 80,000/- रुपयाची रक्कम लाचेची मागणी केली. त्यावेळी माझेकडे फक्त 20 हजार रुपये असल्याने मी त्यांना आणखी 20 हजार रु. तासाभरात आणून एकूण 40 हजार रु. लगेच देतो असे बोललो असता त्यांनी संपूर्ण रक्कम एक रकमी घेवून ये असे सांगितले. त्यामुळे मी पंचासह पुन्हा पो नि आजगावकर व पथक असलेल्या ठिकाणी परत येवून हकीकत सांगितली. तसेच माझेकडे सध्या पूर्ण रक्कम नसल्याने उद्या संपूर्ण रक्कम जमा करून ठेवतो असे सांगितले. त्यानंतर दिनांक 02/04/2019 रोजी पो. उप अधिक्षक, वाल्मीक पाटील, पो नि. आजगावकर व त्यांचे पथकासह विठ्ठलवाडी पो. ठाणे येथे पंचासह आल्यावर त्यांनी मला लाचेच्या सापळाकामी वापरावयाची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी, स्वतःकडील 80 000/- रुपये त्यामध्ये 2000/ रु. दराच्या 15 नोटा व 500/- रु. दराच्या 100 नोटा असे एकूण 80 000/- रुपये हजर केले. त्यामुळे सदरची रक्कम ताब्यात घेऊन सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून लागलीच सापळापूर्व कारवाई केली. त्या आधीच मला माझा मित्र राजू याचा मोबाईल फोन आला होता व त्याने मला कोटकी बँक, उल्हासनगर-5 येथे लगेच येण्यास सांगितल्याने पो.नि. आजगावकर यांना पथकासह तेथेच सापळ्याचे आयोजन केले. त्यानुसार मी, माझी मोटार सायकलवर पासविन्य पंचासोबत निघालो व माझे मागे रिक्षाने सापळा पथक असे आम्ही ते ठिकाणी वेळ येथे पोहचलो. सदर ठिकाणी माझा मित्र राजू देवरे हा काही वेळाने आल्यावर त्याने त्याचेकडील मोबाईलवरुन मिसाळ साहेबांना नेताजी चौक येथे येण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे काही वेळानंतर सायंकाळी 6.15 वा. चे सुमारास मिसाळ साहेब त्यांची वॅगन आर कार क्र. एम एच 05 सी. ए.2141 या कारने चौकातील सर्वानंद आप्टीशन्स समोरील रोडवर आले. तेव्हा मी व मित्र राजू असे त्यांच्या इशाऱ्यावरुन कारमध्ये बसलो तेथे त्यांच्याशी केलेल्या संभाषणात किती आणले? दिले का? असे विचारले असता त्यांना मी 80 हजार आहेत असे सांगितले. त्यावेळी मिसाळ साहेब यांनी इशाऱ्याने पैसे त्यांचेकडे देण्यास सांगितले. तसे मी माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम बाहेर काढून ती मिसाळ साहेब यांच्या समोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारली. त्यावेळी मी माझे मोबाईल वरून पो.नि. आजगावकर यांचे मोबाईल फोनवर कॉल लावून लाचेच्या रकमेचा स्विकार झाल्याचा पूर्वनियोजित इशारा दिला. त्यावेळी मी बसलेल्या कारचे जवळच उभे असलेले पो. उप अधिक्षक वाल्मीक पाटील साहेब, आजगावकर साहेब व पथकाने लागलीच कारचे दरवाजे उघडून कारची चावी काढून घेवून मिसाळ साहेब यांना जागीच 18.20 वाजता ताब्यात घेतले व त्यांना ड्रायव्हींग सीट वरून खाली उतरवून त्यांचे उजव्या हातात असलेली लाचेच्या रकमेचे वेष्टन रक्कम रु. 80,000/- पंचासमक्ष जप्त केले. तसेच मिसाळ साहेब यांचे दोन्ही हात पकडून त्यांना मागील सीटवर बसविले. पो.नि. आजगावकर यांनी मिसाळ साहेबांना त्यांचे नाव व नेमणूक विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव रामदास देवराव मिसाळ, वय-46 वर्षे, पो. हवालदार नेमणूक गुन्हे शाखा, उल्हासनगर युनिट, राहणार - ओम सर्वोदय मंदिर,ए/302,सह्याद्री नगर, कल्याण (प.) असे सांगितले. माझा मित्र पुढील सीटवर बसला असल्याने त्यांचे शेजारी आजगावकर साहेबांनी बसून श्री. पाटील साहेबांनी कार स्वतः चालवून व त्यांच्या मागे मी व पंच असे मोटार सायकलवरून निघून आम्ही सर्व विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे पोहचलो. विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे पोहचल्यावर तेथील [illegible] रक्कमेच्या नोटांवरील क्रमांकाची तपासणी केली असता सापळापूर्व पंचनाम्यातील नोटांप्रमाणे जुळून आली. त्यानंतर कृत्रिम केलेल्या अंधारात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीत मिसाळ साहेब यांचे उजव्या हाताचे बोटास तसेच मिळून आलेल्या नोटांवर देखील अँथ्रासिन पावडर लागल्याचे गुणधर्म आढळून आले. तसा सापळापुर्व-सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा दोन्ही पंच व माझे समक्ष करण्यात आला आहे.अशा प्रकारे यातील लोकसेवक रामदास देवराव मिसाळ, वय 46 वर्षे, नेमणुक - मुख्यालय ठाणे शहर प्रतिनियुक्ती गुन्हे शाखा, घटक 4, उल्हासनगर याठिकाणी कार्यरत असून पूर्वी दाखल असलेल्या गुन्हयात मला अटक न करण्यासाठी लोकसेवक रामदास मिसाळ यांनी दिनांक 01/04/2019 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान माझेकडे 1,35,000/-रु. लाचेची मागणी केली व तडजोडीअंती 80000/-रु. ची मागणी करून सदर लाचेची रक्कम माझा मित्र राजू देवरे यांचेसह घेवून येण्यास सांगितल्यानुसार आज दिनांक 02/04/2019 रोजी 18.20 वा. नेताजी चौक येथील साई आर्केड मधील सर्वानंद आप्टीशन समोरील रोडवर त्यांचे मारुती वॅगन आर कार क्र. एम.एच 05 सी ए 2141 या गाडीमध्ये स्विकारल्यावर मी केलेल्या पुर्वनियोजित इशाऱ्यावरून पोनि. आजगावकर व त्यांचे पथकाने जागीच [illegible] आहे. म्हणून माझी लोकसेवक रामदास देवराव मिसाळ, वय 46 वर्षे, नेमणुक -मुख्यालय ठाणे शहर प्रतिनियुक्ती गुन्हे शाखा घटक 4 उल्हासनगर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. तरी कारवाई होणेस विनंती आहे. माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली असुन तीची प्रिन्ट काढल्यावर ती मी वाचून पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): पोनि । आजगावकर or

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे MOHAN KRUSHANA Rank (पद): I (Inspector)

No.(क.): 1234 to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)



Scanned by CamScanner

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(PSO)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची)

Name (नाम): RAJENDRA PRAKASH MAYAN
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): 1234



Scanned by CamScanner